**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.**

## विद्यार्थ्यांचे परीक्षेसंबंधिच्या प्रश्नांचे उत्तरं

### सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी विद्यापीठ प्रशासनाकडून हार्दिक शुभेच्छा.

**प्र. १ : मी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात उन्हाळी २०२० मध्ये होतो. माझे आधीचे सर्व सत्र आणि विषय क्लिअर आहेत आणि आता फक्त अंतिम सत्राची परीक्षा राहिली आहे , तेव्हा माझी परीक्षा कशी होईल ?**

**उत्तर :** तुम्हाला 5 ऑक्टो. ते 28 ऑक्टो. दरम्यान विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन बहू पर्यायी प्रश्न पद्धतीच्या (MCQ) परीक्षेत सहभागी होऊन परीक्षा द्यावी लागणार आहे. सदर परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्र. २ : मी २०१९-२० सत्रात अंतिम वर्षात होतो परंतु अंतिम सत्राव्यतिरिक्त माझे आधीच्या सत्राचे बॅकलॉग विषय राहिले आहेत. अशा केस मध्ये माझी परीक्षा कशी होईल ?**

**उत्तर :** आपली अंतिम सत्राची परीक्षा आणि बॅकलॉग परीक्षा ह्या ऑनलाईनच होणार आहेत. कृपया विद्यापीठाच्या वेबसाईट वरून वेळापत्रक बघून घ्या.

**प्र. ३ : मी आता २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम वर्षात प्रवेश घेतला पण माझे तिसऱ्या वर्षाचे काही पेपर्स बॅक आहेत. ह्या स्थितीमध्ये मी या बॅकलॉग विषयांची परीक्षा देवू शकतो का ?**

**उत्तर :** होय

**प्र. ४ : जे विद्यार्थी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात होते ते सर्व विद्यार्थी बॅकलॉग विषयांची परीक्षा देवू शकतात का ?**

**उत्तर :** होय, अंतिम वर्षाचे अंतिम सत्र ज्यांनी पूर्ण केलेले आहे आणि आणि ज्यांनी बॅकलॉग विषयांच्या परीक्षेचे फॉर्म विद्यापीठात भरले होते अश्या विद्यार्थ्यांनाच बॅकलॉग विषयांची परीक्षा देता येईल .

**प्र. ५: ज्या विद्यार्थ्यांनी बॅकलॉग विषयांच्या परीक्षेचे फॉर्म विद्यापीठात भरलेले नाहीत अशे विद्यार्थी परीक्षेला बसू शकतात काय ?**

**उत्तर :** नाही.

**प्र. ६ : अंतिम सत्राची ऑनलाईन परीक्षा कशी घेण्यात येईल ?**

**उत्तर :** विद्यापीठाने याकरिता एक अभिनव असे ऑनलाइन परीक्षा पोर्टल बनविले आहे. ह्यापोर्टल चे लॉगिन डिटेल्स इमेल कींवा एस एम एस द्वारे विद्यार्थ्यांना 29 सप्टेंबर पर्यंत प्राप्त होतील. कोणत्याही कारणाने हे डिटेल्स आपल्याला न मिळाल्यास www.pahsu.org ह्या पोर्टल वरून, आपला PRN क्रमांक टाकून आणि मोबाईल otp च्या माध्यमाने पासवर्ड रिकव्हर करता येतो. आपला PRN नंबर हाच आपला username असणार आहे हे लक्षात ठेवा.

**प्र. ७ : ऑनलाईन परीक्षा सुरु असता नेटवर्क गेला तर परीक्षा खंडित होईल का ?**

**उत्तर :** नाही. मात्र निर्धारित वेळेच्या आत पुन्हा लॉगिन करून परीक्षा पूर्ण करावी लागेल. प्रत्येक पेपर हा 90 मिनिटांचा असेल. मात्र आपल्याला वेळापत्रकात दिलेल्या 5 तासांच्या स्लॉट मध्ये कधीही 90 मिनिटांचा हा पेपर सोडविता येईल. या दरम्यान कोणत्याही कारणाने परीक्षा खंडित झाल्यास आपला स्लॉट संपण्यापूर्वी पुन्हा लॉगिन करून परीक्षा पूर्ण करता येईल. परीक्षा जिथे थांबली तेथूनच सुरू होईल. परीक्षा खंडित होण्यापूर्वी सोडविले प्रश्न पुन्हा सोडविण्याची गरज पडणार नाही.

**प्र. ८ : ऑनलाइन परीक्षेचा निकाल कधी लागणार ?**

**उत्तर :** शेवटच्या पेपर नंतर एका आठवड्यात निकाल लावण्याचे प्रयत्न विद्यापीठाद्वारे करण्यात येतील.

**प्र. ९ : जर काही कारणास्तव ऑनलाइन परीक्षा देणे शक्य झाले नाही तर काय होईल ?**

**उत्तर :** जर एखादा विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देण्यास काही कारणास्तव असमर्थ असला तर अशा विद्यार्थ्याची परीक्षा ऑफ लाईन पद्धतीने नियोजित वेळापत्रकानुसार नंतर संबंधित महाविद्यालयांना घ्यायच्या आहेत. ही परीक्षा सुद्धा ऑफलाईन पद्धतीने MCQ (बहु पर्यायी प्रश्न ) तत्वावर घेण्यात येईल. विद्यापीठातर्फे महाविद्यालयांना OMR शीट्स देण्यात येतील. सोडविलेल्या उत्तरपत्रिका तपासल्यानंतर त्याचे निकाल जाहीर करण्यात येईल. यामध्ये ऑफलाईन परीक्षेचे निकाल लागण्यास उशीर होण्याची संभावना राहील.

**प्र. १० : अंतिम वर्षाचे प्रक्टिकल/ प्रोजेक्ट/ सेमिनार/ वर्कशॉप/ dissertation इ. कसे होणार ?**

**उत्तर :** अंतिम वर्षाचे प्रक्टिकल/ प्रोजेक्ट/ सेमिनार/ वर्कशॉप/ dissertation या सर्व परीक्षा विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयाद्वारे ऑनलाइन/ ऑफलाईन किंवा मिक्स मोड पद्धतीने घेण्यात येतील. विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयाशी या परीक्षे करीता संपर्क साधावा.